प्रकरण क्र. २

# 'गाढवाचं लग्न' या नाट्यकृतीचा अभ्यास

# प्रकरण क्र. २
# 'गाढवाचं लग्न' या नाट्यकृतीचा अभ्यास

१८४३ साली विष्णुदास अमृत भावे यांनी 'सीता स्वयंवर' या मराठीतील पहिल्या नाटकाचा प्रयोग करून दाखविला. याच काळात मराठी लोकरंगभूमीवरील लोकनाट्य तमाशामध्येही अनेक बदल घडून येत होते. शाहीर नागेश, शाहीर परशराम, शाहीर सगनभाऊ यांनी दीर्घ कथात्मक लावण्या रचलेल्या आढळतात. त्यांच्या लावण्याचे स्वरूप काही प्रमाणात 'मोहना बटाव' या नंतरच्या काळात निर्माण झालेल्या आणि मराठी तमाशातील पहिला वग ठरलेल्या वगासारखेच होते या वगापूर्वी 'शाहीर सगनभाऊ' यांनी 'कस्तुरीचा सुगंध' ही दीर्घ कथात्मक लावणी लिहिली असून प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी या लावणीच्या आधारे मराठी तमाशातील वगाचा इतिहास आणखी मागे नेता येऊ शकेल असे दाखवून दिले आहे.

मराठीमध्ये वगप्रधान तमाशालाच लोकनाट्य म्हटले जाते. या लोकनाट्यातूनच सत्यशोधकी जलसे, संगीत जलसे (आंबेडकरी तमाशा) विविध शाहिरांची लोकनाट्ये, राष्ट्र सेवादलाचा तमाशा निर्माण झाले. तमाशाचे लोकमानसावर प्रभाव टाकण्याचे आणि रंजनाचे प्रचंड सामर्थ्य लक्षात घेऊन आण्णाभाऊ साठे, शंकर पाटील, पु.ल.देशपांडे, व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार, शाहीर साबळे, वसंत सबनीस अशा अनेक लेखकांनी अनेक प्रभावी वगनाट्ये लिहिली. त्यामध्ये हरिभाऊ वडगावकरांच्या 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याला अनन्यसाधारण महत्व आहे.

## अ) लेखक परिचय :

'गाढवाचं लग्न' या वगनाट्यामुळे दादू इंदुरीकर विस्मृतीच्या अंधारातून प्रकाशाच्या झोतात आले असले तरी मुळात हे वगनाट्य होते. 'हरिबा ऊर्फ हरिभाऊ वडगांवकर' यांचे संपूर्ण नाव 'हरिबा गेनू काशीकेदार' असे होते. ते आपल्या वडिलांचे एकुलते एक चिरंजीव होते. त्यांना लहानपणापासूनच कलेची आवड असल्यामुळे तारूण्यात पदार्पण केल्यावर

त्यांनी समवयस्क मंडळी जमा करून आपला स्वत:चा तमाशाफड उभा केला व त्याचे ठिकठिकाणी प्रयोग करून तो अल्पकाळातच लोकप्रिय केला.

'हरिभाऊ वडगांवकर हे चांगल्यापैकी कवीही होते. त्यांनी अनेक गण, गवळणी आणि काही वगही लिहिले व आपल्या तमाशातून वापरले. 'सावळा कुंभार' आणि 'सूर्य कसा थांबला' हे त्यांचे फार गाजलेले दोन वग होत. या वगांतून त्यांनी प्रेक्षकांची भरपूर करमणूक केली. आपल्या 'सावळ्या कुंभार' या वगात सावळ्या कुंभाराची भूमिका ते स्वत: करत. दादू इंदुरीकर हे हरिभाऊ वडगावकरांना गुरूस्थानी मानीत. बोलण्याच्या ओघात हरिभाऊंचे नाव जरी निघाले तरी आपली मान विनम्र करून दादोबा त्यांना मनोमन अभिवादन करीत व इतरांना सांगत की, असा सोंगाड्या झाला नाही व होणार नाही. अशा हरिभाऊ या श्रेष्ठ कलावंताचे निधन प्रसिद्धीच्या वलयात असतानाच १९४० झाले.' [१]

हरिभाऊंच्या निधनानंतर सुमारे २०-२५ वर्षांनी दादू इंदुरीकर म्हणजेच 'गजानन राघू सरोदे' या पुणे जिल्हयातील इंदुरी या गावातील कलगी तुऱ्यातील नामांकित तमासगीर राघोबा इंदुरीकर यांच्या मुलाने 'सावळा कुंभार' हा वग बसवायचा संकल्प सोडला. या वगात पट्टीचा सोंगाड्या नसल्यामुळे वग वठत नव्हता. पण ते आव्हान दादू इंदुरीकरांनी स्वीकारलं आणि शंकरराव शिवणेकरांना कलावंताना बोलवायला सांगितले. मूळ वगाचे हस्तलिखित उपलब्ध नव्हते. कथानक फक्त माहीत होते. वास्तविक पाहता आज उपलब्ध असणारी या वगनाट्याची संहिता दादू इंदुरीकरांमुळेच सिद्ध झालेली आहे. त्यांनी वगातील सर्व पात्रे फडातील कलावंतांना दिली आणि स्वत: सावळा कुंभार झाले. या सर्व व्यापात शंकरराव घाणेकर आणि मधुकरशेठ नेरार्ळेनी दादबांना फार मोलाचे सहकार्य केले. वगाची नव्या धाटणीत तालीम सुरू झाली तेव्हाच ' 'सावळ्या कुंभार' नाव बदलून 'गाढवाचं लग्न' असे नाव 'शंकरराव घाणेकरांच्या' सल्ल्याने ठेवले गेले.'[२] तसेच पांढरपेशा प्रेक्षकवर्गाला आकर्षित करण्यासाठी (वगातील अश्लील भाग गाळण्यात आला.) वगात काही बदलही केले गेले.[३]

'घाणेकरांच्या ध्यानात आलं. वग रंगत गेला तरी दोन -सव्वादोन तासांच्या वर जात नाही. कथानक आणखी विस्तृत करायला वाव होता. राजदरबारात काही नवे प्रसंग टाकले तर बहार येईल. त्यांनी राजदरबारातल्या प्रसंगांची माहिती दादबाला आणि शिवणेकरांना दिली. दोघांनी चार दिवसांची वेळ मागून घेतली. सलग ४०-४५ मिनिटं चालणारा संवाद घोणकरांना अपेक्षित होता. त्यानुसार वगाच्या तालमी चालू असताना काही बदल त्यांनी सुचवले आणि मग सत्यवर्मा महाराज आणि दिवाणजींच्या भूमिकेत विनोदानं आणखी भर पडली.'[४]

'दादबांची अफलातून कॉमेडी' ऐकून घाणेकर हासून बेजार झाले आणि 'ह्या लोकनाट्याचं रूपांतर आपण वगनाट्यात करू'[५] असा सल्ला इंदुरीकरांना त्यांनी दिला व तो सल्ला मान्य करण्यात आला. अशा प्रकारे 'सावळा कुंभार' या लोकनाट्याचे 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यात रूपांतर झाले.

## ब) संविधानक /कथावस्तू -

प्राचीन काळापासून मनुष्यास कथा श्रवणाची आवड आहे. ही कथेची ओढ त्याच्या बाल्यावस्थेपासूनच जन्म घेते ती वृद्धावस्थेपर्यंत त्याची साथ करते. कथा श्रवणाने एक प्रकारचा मानसिक आनंद श्रोत्यास प्राप्त होतो. या कथेपासूनच कथानक तयार होत असते वास्तविक पाहता कथानक म्हणजेसुद्धा कथाच असते. पण ती विशिष्ट सूत्रात गोवली गेलेली असते. तिला विशिष्ट गती असते.

कथा कोणत्या फॉर्ममध्ये (धाटणी/साचामध्ये) व्यक्त केली जाते त्यानुसार ललित वाङ्मयात वेगवेगळे प्रकार पाडण्यात आले आहेत. ते म्हणजे कादंबरी, कथा, नाटक, कविता या प्रकारांचे पुन्हा उपप्रकारही पडतात. ते त्यांच्यातील कथानकांच्या प्रकारानुसार रहस्य, विनोदी, गूढ, सामाजिक, भितीप्रद अशा प्रकारातही विभागणी होते. यातील कथा, कादंबरी, कविता हे प्रकार वाचनीय किंवा श्रवणीय आहेत. पण नाटक किंवा नाट्य हे मात्र वाचनीय किंवा श्रवणीय व प्रेक्षणीय असते. ते एकाचवेळी दृकश्राव्य माध्यमातून अभिव्यक्त

होत असते. म्हणून ते प्रेक्षकांच्या मनावर अधिक परिणाम करते. त्यामुळे त्याचे संविधानक हे तितक्या ताकदीने आणि प्रभावी संवादांच्या माध्यमातून व्यक्त होणे गरजेचे असते.

नाट्य यशस्वी होण्यासाठी प्रभावी संविधानकाची नितांत आवश्यकता असते. वं. शा. देसाई म्हणतात, 'गोष्टीतील निवडक प्रसंग एका सूत्रात गोवून, ते परिणामकारक रीतीने वाचक-प्रेक्षकांसमोर मांडण्याकरिता जी कथा नाटककार तयार करतो त्याला कथानक म्हणतात.' [६]

लोकरंगभूमीवरील वगनाट्यात संविधानकास अनन्यसाधारण महत्व असते. संविधानक पात्रांच्या तोंडून अभिव्यक्त होते आणि विशिष्ट गती होते. बदलत्या काळाचे, घटनांचे, प्रसंगांचे अनेक संदर्भ त्यामध्ये अपेक्षित असतात. त्यानुसार अनेक नवीन घटना, प्रसंग, कथानकाला धरूनच वगनाट्यात समाविष्ट होतात आणि चटकदार संवादांच्या माध्यमातून ते अभिव्यक्त होतात म्हणूनच मराठी माणूस वगनाट्याकडे खेचला जातो. ही वगनाट्ये तमाशाप्रिय लोकांची व तमाशाचीही भूक भागवितात. मराठी लोकरंगभूमीवर अनेक वगनाट्ये लोकप्रिय ठरली. त्यामध्ये 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याला सर्वाधिक लोकप्रियता प्राप्त झाली कारण या वगनाट्याचे कथानक हे अध्यात्माला सामाजिकतेच्या पातळीवर घेऊन येते.

'गाढवाचं लग्न' या वगनाट्याचा प्रारंभ वगनाट्याच्या परंपरेला अनुसरून गणेशाच्या किंवा विघ्नहर्त्याच्या नमनाने म्हणजेच गण-

हे गजवदना, हे गजवदना, नाचे रणांगणा,
आधि तुझे नाव घेऊ मग सभेला उभे राहू...
आनंद आनंद आनंद आनंद होईल माझ्या मना.. धृ ॥
हरि कवि चाल काढी जसा रणि बाण सोडी
तोडू या तोडू या तोडू या तोडू या
वैऱ्यांच्या माना रणा...

या गणाने गणेशाची प्रार्थना करून होतो. रंगभूमीच्या रणांगणावरील प्रतिस्पर्ध्यांना

नमवण्यासाठी आणि आपला प्रयोग यशस्वी होण्यासाठी गणेशाचे नमन केले जाते. येथे रंगभूमीला रणांगणाची उपमा दिलेली दिसते.

गणानंतर गौळणी बाजारच्या तयारीला लागतात. प्रथमत: मावशीचा शोध घेतला जातो. मावशी आल्या आल्या सर्व गौळणी आल्या की नाही याची खात्री करून घेते आणि कोणत्या गौळणीने कोणता माल घेतलेला आहे याचीही चौकशी करते. गौळर्णींनी कोणकोणते अलंकार, दागिने घातलेले आहेत याचीही चौकशी करते आणि स्वत:च्या गळ्याला गंडमाळा, पोटाला पानथरी, पायाला नारू या विकारांनाच अलंकार म्हणून विडंबन साधते. कृष्णाची वाट टाळून दुसऱ्या वाटेने जाण्याचे ठरते. तोच तेथे कृष्ण अवतरतो. नंतर कृष्ण आणि गवळर्णींमध्ये, कृष्ण आणि मावशीमध्ये संवाद होतो. कृष्ण स्वत:चे अष्ट अवतार कोणते व त्या अवतारात केलेले कार्य सांगतो. शेवटी सर्व गौळणी आणि मावशी शरण आल्यानंतर आणि गौळणीच्या रूपाने स्वत:चे अस्सल दान घेतल्यानंतर कृष्ण सर्व गौळर्णींना जाण्याची अनुमती देतो आणि गौळण संपते.

सर्व गवळणी गेल्यानंतर कृष्ण आणि त्याचा मित्र यांच्यात एका सुंदरीच्या सौंदर्यावरून बतावणी सुरू होते आणि कृष्णाचे श्रेष्ठत्व त्या सुंदरीला पटवून देण्यासाठी कृष्ण आणि मित्र तिच्याशी वाद घालण्यासाठी जातात आणि शेवटी ब्रह्म-माया, शिव-शक्ती यांच्यातील कोणीही श्रेष्ठ वा कनिष्ठ नसून शिव-शक्ती दोघेही श्रेष्ठ असल्याचे दिवा-ज्योत, सागरावरील वारा-लाटा यांच्या उदाहरणाच्या माध्यमातून पटवून दिले जाते आणि बतावणी संपते.

वगनाट्याचे कथानक सुरू होण्यापूर्वी वगनाट्याच्या परंपरेला अनुसरूनच शिलकार/ टाकणीची लावणी/ कटाव सादर होतो. त्यातून वगनाट्याच्या कथानकाचा स्थूलसंकेत दिला जातो. वगनाट्यात पुढे काय पहावयास मिळणार आहे ते थोडक्यात सांगितले जाते.
कटाव -

ऐका तुम्ही वर्कगतीची ठेव - जशी करणी तसा करणीचा अनुभव

ऐष आरामात असता इंद्र-मुनी आणि गण गंधर्व..

भर विलासात बसले होते सर्व गोष्ट एक घडली तिथं

अपूर्व कर्माची कहाणी - ज्याचे त्याला मिळाले फळ

तेव्हा तात्काळ कर्मगती...

स्वकर्माचे फळ स्वत:ला मिळतेच. आपण कशा प्रकारचे कर्म करतो यावर फळाचे स्वरूप अवलंबून असते आणि हा नियम माणसांप्रमाणेच देवतांनाही लागू पडतो याचे इंद्राच्या दरबारात घडलेल्या एका प्रसंगाच्या आधारे स्पष्टीकरण येथे पहावयास मिळते.

'गाढवाचं लग्न' या वगनाट्याचे मूळ कथाबीज 'श्री नवनाथ भक्तीसार' या ग्रंथातील २५ व्या अध्यायामधील आहे ती कथा पुढीलप्रमाणे-

'इंद्राच्या सभेत मेनका सुंदर नृत्य करीत होती. सुरोचन नावाचा गंधर्व त्यावेळी तेथे होता. त्याने विचित्र वर्तन केल्यामुळे इंद्राने त्याला शाप दिला 'सुरोचना तू गाढवासारखा वागलास ! जा मृत्यूलोकात गाढवाचा जन्म घेऊन खुशाल वाटेल तसा वाग !'

सुरोचनाने इंद्राची क्षमा मागितली. इंद्र म्हणाला 'मिथुला नगरीचा राजा सत्यवर्मा याची कन्या सत्यवती हिच्याबरोबर लग्न होऊन तुला विक्रमादित्य नावाचा पुत्र होईल मग तू इथे परत येशील.'

इंद्राच्या शापाप्रमाणे तो मिथुलेजवळ चरत असतानाच रानातल्या गाढवाबरोबर तो कमठ नावाच्या कुंभाराच्या घरी गेला आणि रात्री माणसाच्या आवाजात म्हणे, 'कुंभारा मिथुलेचा राजा सत्यवर्मा याची सुंदर कन्या माझी बायको म्हणून आणून दे.' हे ऐकून कुंभार घाबरला व नगर सोडून जाऊ लागला. तेव्हा राजाने त्याला बोलावून घेतले व नगर सोडून जाण्याचे कारण विचारले आणि अभय दिले. तेव्हा कुंभाराने सांगितले की, 'रात्री-बेरात्री रोज गाढव मला सांगतो, सत्यवर्मा राजाची मुलगी सत्यवती हिचे माझ्याशी लग्न करून दे.' महाराज हे गाढवाचे बोलणे ऐकून मी भ्रमिष्ट झालो म्हणा ना ! वाटल्यास तुम्ही गाढवाची परीक्षा करावी तो कोणीतरी देवही असेल.'

राजाने त्यावर विचार करून सांगितले, 'रात्री जर तो गाढव पुन्हा तुला तसेच म्हणाला

तर तू त्याला उलट सांग, 'मी तुझे म्हणणे राजाच्या कानावर घातले तो असे म्हणतो की, सर्व मिथुला नगरी तू तांब्याची करून दिलीस तर सत्यवतीचे लग्न तुझ्याशी करून देईन.'हे म्हणणे कमठ कुंभाराने गाढवास सांगितले आणि गाढवाने राजाच्या म्हणण्याप्रमाणे विश्वकर्म्याच्या मदतीने संपूर्ण मिथुला नगरी एका रात्रीत तांब्याची करून दिली.

राजाने थक्क होऊन कुंभारास बोलावून घेतले व म्हणाला, 'तो गाढव कोणीतरी देव आहे हे खास. मी त्याला कन्या देण्यास तयार आहे. सत्यवतीला तुझ्या हवाली करतो तिला घेऊन तू ह्या नगरातून कुठेतरी दूरदेशी जाऊन राहा.' राजाने सत्यवतीला सर्व समजावून सांगितले आणि म्हणाला, 'तू जर युक्ती करून पुण्यबळाने त्याला गर्दभ देहातून मुक्त केलेस, तर तुला चांगलेच भाग्य लाभेल.' त्यावेळी गाढव मनुष्यवाणीने राजाला म्हणाला, 'सत्यवर्मा मी सुरोचना नावाचा श्रेष्ठ गंधर्व आहे मी इंद्राच्या शापामुळे गर्दभाच्या जन्माला आलो आहे. मला उ:शापही मिळाला आहे. योग्य वेळ येताच मी मुळरूप धारण करीन.' ते ऐकून राजा आनंदित झाला त्याने कुंभाराला रात्रीच नगर सोडून जाण्यास सांगितले. रात्रीच ते सर्वजण मिथुला सोडून अवंती नगरीकडे निघाले.'[७]

'गाढवाचं लग्न' या वगनाट्यात प्रस्तुत कथेमध्ये कमठ ऐवजी सावळा, मेनका ऐवजी रंभा, सुरोचन ऐवजी चित्रसेन असा पात्रांच्या किंवा व्यक्तिरेखांच्या नावामध्ये बदल केला आहे. तसेच बृहस्पती दिवाणजी, ताईसाहेब, अशा काही नव्या व्यक्तिरेखांची भर घातली आहे. कथानकामध्येही बृहस्पती सोबत सावळाची स्वर्गवारी तसेच उ:शापामधील थोडासा बदल, राजकुमारीने 'पण' ठेवणे अशा काही काल्पनिक घटना प्रसंगांचा समावेश वगनाट्यात करण्यात आला आहे.

सावळा कुंभार दारिद्रयाची व्यथा व्यक्त करत आणि स्वत:च्या तोंडून परमेश्वराचे नामस्मरण होत नाही ही खंत व्यक्त करत रंगमंचावर येतो. स्वत:ची गाढवं शोधत असतानाच त्याची भेट बृहस्पतीशी होते. त्याच्याजवळ सावळा हट्ट धरुन त्याचा शिष्य होतो आणि बृहस्पती सोबत स्वर्गात इंद्राच्या दरबारात जातो. तेथे त्याचे स्वागतही होत नाही आणि

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

त्याला कोणी अभिवादनही करत नाही त्यामुळे सावळ्याला देवांना गर्व झाल्याचे जाणवते. तो देवांना सिंहासनावरून उठवून खाली बसवतो आणि त्यांचे गर्वहरण करतो. इंद्रदेवांच्या आज्ञेने अप्सरा, रंभा अशा दोघी-तिघीज़णी देवांच्या करमणुकीसाठी नाचत असतानाच चित्रसेन गंधर्व उन्मत्त होऊन रंभेचा हात पकडतो व रंगाचा भंग करतो. या घटनेने सावळाही संतप्त प्रतिक्रिया देत कृष्ण, राम, विष्णू, ब्रह्मदेव या सर्व देवांच्या हीन कर्तृत्वाचा दाखला देऊन पृथ्वीवासियांची तुलना देवलोकाशी करतो तसेच इंद्राच्या दरबाराला रंडीबाज म्हणून हिणवतो. आणि पृथ्वीवर परत येतो. स्वर्गात इंद्र चित्रसेन गंधर्वाला शाप देतो की, 'जा, तू मृत्यूलोकी गाढव होऊन फिरशील !' पण बृहस्पतीच्या आज्ञेमुळे उ:शाप देतो की, 'मिथुला नगरीचा राजा सत्यवर्मा / सत्यधर्म यांची एकुलती एक कन्या सत्यवती हिच्याशी तुझा विवाह होईल आणि त्या विवाहानंतर तू पूर्ववत होशील.'

सावळा स्वगृही परतल्यानंतर गंगीला सावळा स्वर्गातून जाऊन आला यावर विश्वास बसत नाही. ती आशीर्वाद मागते तेव्हा 'जा मरस्तवर रंडकी रहा' हा आशीर्वाद सावळा गंगीला देतो. गंगीला तिच्या विचारण्यानुसार स्वत:च्या आणि गंगीच्या दिवंगत आई-वडिलांची माहिती देतो. सावळा गाढवं आणण्यासाठी जातो तेव्हा दोन ऐवजी तीन गाढवं आणतो आणि नवीन गाढवाचा मालक आल्यानंतर रोखोळी घेऊन गाढव परत करण्याचा विचारही सावळा करतो. ते नवीन गाढव म्हणजेच 'चित्रसेन गंधर्व.'

राजा सत्यवर्मा / सत्यधर्म आणि दिवाणजी उपवर झालेल्या राजकुमारीच्या विवाहाविषयी चर्चा करत असताना राजकुमारी त्यांच्यासमोर 'पण' ठेवते की 'एका रात्रीत एका खांबावर, तांब्या पितळीची जो कोणी सात तळाची माडी बांधील, त्याच्याशी मी लग्न करीन.' या पणाची दवंडी दिवाणजी गावात पिटतात आणि कुंभारवाड्यात पिटल्यानंतर सावळाचे तिसरे नवे गाढव सावळाला हा पैजेचा विडा उचलावयास सांगते. गंगीही त्याला अनुमोदन देते आणि सावळा विडा उचलण्यासाठी राजदरबारात दाखल होतो. विडा उचलताना राजा सावळाकडून लिहून घेतो की, 'जर सावळाच्या पोराने माडी बांधली नाही तर राजाने


16350

त्याला फाशी द्यावी' नंतर सावळाही राजाकडून लिहून घेतो की 'सावळा कुंभाराचा मुलगा गाढव असला तरी राजानं आपली मुलगी सावळा कुंभाराच्या मुलाला दिली पाहिजे.' सावळा घरी परततो. सावळाच्या घरावर राजा शिपायांचा पहारा बसवतो.

विडा उचलून परतलेल्या सावळ्याची नवीन गाढव ( चित्रसेन गंधर्व) सुरवातीला थट्टा करतो आणि नंतर सांगतो की गावाच्या खाली माडी बांधलेली आहे. सावळा व गंगी माडी पाहून येतात मग सावळा राजाला माडी बांधल्याचे सांगायला जातो. राजा आणि दिवाणजी माडी पाहून आश्चर्यचकीत होतात आणि सावकाश मुलाचे वऱ्हाड घेऊन येण्यास सांगतात. सावळा वऱ्हाड घेऊन येतो मांडवभेट होते. पण जेव्हा नवऱ्या मुलाचे तोंड पहाण्याची वेळ येते तेव्हा मात्र नवरा गाढव असल्याचे लक्षात येते पण सावळा त्याच्याजवळचा राजाने लिहून दिलेला कागद दाखवतो आणि राजकन्येचे लग्न गाढवाशी लावण्यास प्रवृत्त करतो. राजा आपल्या दिल्या शद्वाला जागतो आणि आपल्या मुलीचे लग्न गाढवाशी लावून देतो. लग्न लागताच गाढवाचे रूपांतर चित्रसेन गंधर्वात होते आणि तो सर्व हकीकत कथन करतो.

## क) व्यक्तिरेखा -

साहित्यकृती कोणतीही असो त्यामध्ये पात्रांना अनन्यसाधारण महत्व असते. त्यातही नाट्यात तर पात्रांना अनुसरूनच संवाद लिहिलेले असल्याने नाट्यात पात्रांना सर्वाधिक महत्व असते. नाट्य हे पात्रांच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या संवादामधून आकार घेते. लोकरंगभूमीवरील अविष्कारामध्ये तर पात्रांनाच सर्वस्वी महत्व असते. कारण लिखित संविधानक नसते. प्रत्येक पात्राने स्वकौशल्याने नाट्यात रंग भरायचा असतो. तमाशा किंवा वगनाट्यासारख्या लोककलांचा आविष्कार घडवत असताना पात्रांच्या तोंडून कथानक विशिष्ट गती घेत असते आणि लोकमानसावर पकड घेते. पात्रांच्या तोंडून बदलत्या काळाचे संदर्भ व्यक्त होतात. तसेच वर्तमानकाळात घडणाऱ्या घटनांचेही उल्लेख व्यक्तिरेखा स्वत:च्या संवादातून व्यक्त करतात. हजरजबाबी आणि तैलबुद्धीच्या नटांनी आपल्या हजरजबाबीपणा दाखवून

प्रेक्षकांना किंवा रसिकांना खुष करायचे असते. यामुळेच वगनाट्यातील व्यक्तिरेखा साकारणारे अभिनेते / कलावंत समाज विसरत नाही. लोकरंगभूमीवरील अनेक वगनाट्ये ते वगनाट्य साकार करणाऱ्या कलावंताच्या नावाने प्रसिद्धीस पोचतात. किंबहुना वगनाट्यातील भूमिका इतक्या आव्हानात्मक असतात की ती भूमिका त्याच नटाने करणे गरजेचे असते. हरिभाऊ वडगांवकरांनंतर अनेक वर्ष 'सावळा कुंभार' हा वग 'पट्टीचा सोंगाड्या मिळत नाही म्हणून बंद होता.' [८] ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

प्रस्तुत 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यामध्ये सावळा, गंगी, बृहस्पती, चित्रसेन गंधर्व, दिवाणजी, राजा, इंद्र, राजकुमारी, ताईसाहेब, द्वारपाल, देवगण इ. व्यक्तीरेखा आहेत.

## सावळा कुंभार -

संपूर्ण वगनाट्य या व्यक्तिरेखेभोवती केंद्रित झाले आहे. सावळा ही धार्मिक स्वभावाची, प्रसंगी स्वत:ची चुक कबूल करून पश्चात्ताप व्यक्त करणारी, परखड स्वभावाची व्यक्तिरेखा आपल्यासमोर येते. अनेक द्व्यर्थी संवाद त्याच्या तोंडून व्यक्त होतात. चटकदार संवाद ऐकायला मिळतात. अतिशय सरळ स्वभावाचा मनमोकळ्या स्वभावाचा सावळा सुरवातीला पश्चात्ताप करत स्वत:ला दोष देत प्रेक्षकांसमोर येतो. गुडघ्यापर्यंत दोन टांगी धोतर, अंगात जुनाट बंडी, डोक्यावर शिंदेशाही पागोटं, कपाळावर केशरी टिळा आणि खांद्यावर सुरवातीला उपरण आणि नंतर गंगीचं लुगडं असा वेष परिधान केलेला आहे. स्वत:च्या जीवनात राम नसल्याचे समजणारा सावळा बृहस्पती भेटताच त्याचा शिष्य होतो आणि त्याच्यासोबत इंद्राच्या दरबारात जातो. तेथे इंद्रासह सर्व देवगणांचे गर्वहरण करतो. इंद्राला अलिंगन देण्यास नकार देतो आणि चित्रसेन गंधर्व रंभेचा हात धरतो. तेव्हा संपूर्ण दरबाराला इंद्राचा दरबार रंडीबाज म्हणून हिणवतो. इथे त्याच्या स्वभावातील परखडपणा जाणवतो. बृहस्पती जेव्हा त्याला शांती ठेवण्याचे आवाहन करतो तेव्हा 'शांती' या शब्दाचा 'स्त्री' असा अर्थ लावतो यावरून त्याचे धर्माविषयीचे अज्ञानही दिसून येते.

स्वर्गातून भूतलावर आल्यानंतर गंगीच्या तारस्वरासमोर माघार घेतो तेव्हा तो समंजसही असल्याचे जाणवते. गावाखालून गाढवं धरून आणल्यानंतर एक गाढव जास्त आल्याचे जाणताच गाढवाचा मालक आल्यानंतर राखोळी घेऊन गाढव परत करण्याचे ठरवतो.इथे त्याच्यातील प्रामाणिकपणा आणि व्यवहारीवृत्ती दिसून येते.

बोलणाऱ्या गाढवाच्या (चित्रसेन गंधर्वाच्या) आणि गंगीच्या सांगण्यावरून राजदरबारामध्ये राजकुमारी राजकुंवर / सत्यवती हिच्या पैजेचा विडा उचलायला गेल्यानंतर राजा सावळाकडून लिहून घेतो तेव्हा सावळाही राजाकडून लिहून घेतो की सावळ्याचा मुलगा गाढव असला तरी राजाने आपल्या राजकन्येचा विवाह गाढवासोबत लावून दिला पाहिजे. येथे सावळा अतिशय चतुर असल्याचे निदर्शनास येते आणि गावगुंडी पेच टाकण्यातही तो कसा पटाईत आहे हे ही जाणवते. घरी परतल्यानंतर मात्र गाढवाने (चित्रसेन गंधर्वाने) केलेल्या चेष्टेवरून घाबरून जातो तेव्हा त्याच्यातील भित्रेपणा आणि भोळेपणा लक्षात येतो. राजदरबारात राजाला रामराम करून तंबाखू मागतो व फटका खाल्यावर राजाचीच अब्रू काढतो तेव्हा त्याच्या स्वभावातील परखडपणा दिसून येतो.

राजदरबारात वऱ्हाड घेऊन आल्यानंतर राजाची बहीण नवऱ्या मुलाचे तोंड पाहिल्यानंतर नवरा गाढव असल्याचे सूचित करते. तेव्हा राजा आणि दिवाणजी गाढवाशी सत्यवतीचे लग्न लावून देण्यास नकार देतात. तेव्हा बाणेदारपणे राजाकडून लिहून घेतलेला कागद राजाला दाखवतो, आणि राजाला स्वत:च्या कन्येचा विवाह गाढवाशी लावून देण्यास प्रवृत्त करतो. तेव्हा स्वत: राजाही आपण सावळ्याच्या गावगुंडी पेचात अडकल्याचे प्रामाणिकपणे कबूल करतो.

संपूर्ण वगनाट्यात सावळा कुंभाराचा हजरजबाबीपणा, द्विअर्थी संवाद, भाबडेपणा, चतुरपणा, भोळेपणा, परखडपणा, समजूतदारपणा, प्रसंगावधान, गावगुंडी पेच, धार्मिकता तरीही धर्माविषयी अज्ञानी दिसून येतो. सावळा गरीब कुटुंबातील एक संसारी, धार्मिक, कष्ट करून स्वत:चा उदरनिर्वाह करणारा प्रसंगी स्वत:च्या पुराणांच्या अभ्यासाने आणि परखडपणाने

साक्षात इंद्राला आणि देवगणांना स्वर्गात, तर भूतलावर मिथुला नगरीचा राजा सत्यवर्मा याला शिकवण देताना आढळून येतो. पण त्याला धड आशीर्वादही देता येत नाही.

**गंगी -**

'गाढवाचं लग्न' या वगनाट्यातील दुसरे प्रमुख पात्र म्हणजे गंगी. 'गंगी' ही सावळ्या कुंभाराची पत्नी. थोडीशी कजाग तरीही सावळावर प्रेम करणारी. थोडीशी भांडखोर व्यक्तिरेखा म्हणून समोर येते. 'नऊवारी कासोटा बांधून नेसलेले लुगडं. कोपऱ्यापर्यंत गळाभरून शिवलेली बंदाची चोळी, नाकात मोठी नथ, हातात चांदीचे गोठ, कपाळावर कुंकवाची आडवी चिरी असा गंगीचा वेश असायचा'.[१]

नाट्याच्या सुरवातीलाच गंगी सावळ्याला गावाखालून गाढवं आणण्यास सांगते. सावळ्याला भूक लागलेली असतानाही गाढवं आणण्यासाठी पाठवते. सावळा तसाच बृहस्पतीबरोबर स्वर्गात जाऊन येतो. स्वर्गातून सावळा परत घरी आल्यानंतर सुरवातीला गंगी सावळ्याला भूत समजते पण नंतर मनोभावे सावळ्याच्या पाया पडून आशीर्वाद मागते. यातून तिची धार्मिकवृत्ती दिसून येते. स्वत:च्या आई वडिलांची आणि सासू सासऱ्यांची आस्थेने विचारपूस करते. यातून तिची माहेरची ओढ जाणवते. सावळ्याला 'गाढवं लवकर घेऊन या. उद्या बाजार हाय. जाळा भरून ठेवलाय बरं का' असे सांगते तेव्हा कर्तव्यतत्पर स्त्री आणि पतीला कर्तव्याची जाणीव करून देणारी पत्नी आपणास पहावयास मिळते.

दोन्ही पोरांना शाळंत घातलीत का ? म्हाद्याला पाटी पेनसल आणा. दगडीला एखादी गवन आणा आणि तुम्हाला पण बाराबंदी आणा असे गंगी जेव्हा सावळाला सांगते तेव्हा गंगी ही संसारी स्त्री / गृहिणी असल्याचे आढळते. सावळाच्या संसाराची सर्व जबाबदारी यशस्वीपणे पेलणारी स्त्री म्हणून ती आपणासमोर येते.

सावळा, तिने ढकलताच खाली पडतो तेव्हा सावळा लूज झाल्याचेही ती सांगते. या प्रसंगावरून तिचे लाडात येणेही पाहायला मिळते. सावळा जेव्हा तिला बुचकोट (बुशकोट) घालण्यास सांगतो. पण ती बुशकोट घालण्यास नकार देते. तेव्हा तिच्यातील परंपरावादी

दृष्टीकोन दिसून येतो. नवीन बोलणारे गाढव पाहिल्यानंतर तिला अत्यानंद होतो आणि ती सावळाला गाढवाचे म्हणणे मान्य करायला लावून पैजेचा विडा उचलायला राजाकडे पाठवून देते. तेव्हा तिचा विचारी स्वभाव जाणवतो. झोपताना ती सावळ्यालाच अंथरूण टाकायला लावते तेव्हा तिचा हट्टी स्वभाव जाणवतो. वऱ्हाड घेऊन गेल्यानंतर ताईसाहेब आणि गंगी यांच्यात पितळेच्या ताटावरून भांडण होते. यावरून तिचा भांडखोर स्वभावही दिसून येतो.

'मोटं घर पोकळ वासा, वारं जाई भसाभसा' अशा म्हणींचाही गंगी वापर करताना दिसून येते. एकूण संपूर्ण वगनाट्यात गंगी ही व्यक्तिरेखा करारी, स्वाभिमानी, धार्मिकवृत्तीची, भांडखोर, कजाग, संसारी, कर्तव्यदक्ष, अस्सल गावाकडची कुंभारीण म्हणून समोर येते.

**बृहस्पती -**

सावळा 'सुसंगती सदा घडो' हा श्लोक म्हणत असतानाच

'मना कर्मयोगे, जगी जन्म झाला, परी शेवटी काळ, मोखी निमाला'

हा श्लोक म्हणत बृहस्पती साक्षात देवांचे गुरू अवतरतात आणि सावळा त्यांची विचारपूस करू लागतो. दाढी, मिशा, केस वाढलेले, भगवी कफनी वस्त्र परिधान केलेला ब्रह्मचारी बृहस्पती सावळ्याला कानमंत्र / गुरूमंत्र देतो / दीक्षा देतो आणि

'परधन मानावे जैसे वमन, परस्त्री मातेसमान जान।

हे चित्त ठेवूनिया समाधान, तिर्थेपट्टने धुंडावी ॥'

असा उपदेशही करतो आणि स्वत:च्या शिष्याच्या आग्रहाखातर गायीच्या शेपटाला धरून सावळास स्वर्गात नेतो. स्वर्गात गेल्यानंतर इंद्राशी सावळ्याची ओळख गुरूबंधू म्हणून करून देतो.

देवांच्या करमणुकीसाठी अप्सरा, रंभा यांना बोलाविले जाते आणि चित्रसेन जेव्हा रंभेचा हात धरतो तेव्हा इंद्र त्याला शाप देतो त्यावेळी बृहस्पतीच इंद्राला आज्ञा देतो की, 'चित्रसेनाने गंमत म्हणून रंभेचा हात धरला आहे आणि तो आता तुला शरण आला आहे तेव्हा त्याला उ:शाप दे.'

बृहस्पती ही या वगनाट्यातील महत्वपूर्ण भूमिका आहे. दया, क्षमा, शांती, करूणा, शिष्यप्रेम, शिष्यावर वचक इ. गुण या व्यक्तिरेखेत पहावयास मिळतात.

**चित्रसेन -**

'गाढवाचं लग्न' या वगनाट्यात चित्रसेन गंधर्व ही महत्वाची व्यक्तिरेखा आहे. कारण या व्यक्तिरेखेला मिळालेल्या उ:शापातून उर्वरित नाट्याची निर्मिती आणि त्याच्या लग्नाच्या खटाटोपातून नाट्य आकारास येते. ही व्यक्तिरेखा सुरवातीस देवगण नंतर गाढव आणि पुन्हा देवगण / देव अशा रूपातून रंगमंचावर वावरताना आढळते.

स्वर्गामध्ये सर्व देव अप्सरा, रंभा यांच्या नाचगाण्यामध्ये तल्लीन झालेले असताना रंभेची गंमत करण्याच्या हेतूने रंभेचा हात चित्रसेन गंधर्व धरतो. सावळा तेथे समस्त देवावर परखड टीका करतो आणि मृत्यूलोकात परत येतो. पण इंद्र चित्रसेनाकडून घडलेल्या अपराधाबद्दल चित्रसेनाला शाप देतो, 'जा तू मृत्युलोकी गाढव होऊन फिरशील' पण बृहस्पतीच्या सांगण्यामुळे चित्रसेनाने माफी मागितल्यामुळे त्याला उ:शाप मिळतो तो असा - 'मिथुला नगरीचा राजा सत्यवर्मा / सत्यधर्म याची एकुलती एक कन्या सत्यवती हिच्याशी तुझा विवाह होईल आणि त्या विवाहात तू पूर्ववत होशील'. या उ:शापामुळे चित्रसेन गाढवाचे रूप घेऊन मिथुला नगरीत सावळ्याच्या इतर दोन गाढवांसोबत राहू लागतो.

मिथुला नगरीच्या राजकुमारीचा 'एका रात्रीत एका खांबावर सात तळाची तांब्या-पितळची माडी बांधील. त्याच्याशी मी लग्न करीन' या 'पणा'ची दवंडी ऐकल्यानंतर सावळा आणि गंगी यांना चित्रसेन झोपेतून उठवतो आणि सावळ्याला पैजेचा विडा उचलण्यासाठी राजदरबारात पाठवून देतो आणि स्वत: गावाच्या खाली एका रात्रीत एका खांबावर सात तळाची तांब्या-पितळची माडी बांधून काढतो. सावळा विडा उचलून आल्यानंतर त्याची थोडी गंमतही करतो आणि राजकुमारी सत्यवतीशी लग्न लागताच आपल्या मुळरूपात येऊन शाप आणि उ:शापाची सर्व हकीकत सर्वांना सांगतो.

**दिवाणजी -**

या भूमिकेने अफलातून लोकप्रियता प्राप्त केल्याचे दिसते. दिवाणजी आणि महाराज राजदरबारात सत्यवतीच्या विवाहासंबंधी चर्चा करत आहेत पण तमाशात / वगनाट्यात शोभेल असाच दिवाणजी येथे पहावयास मिळतो. राजाची पदोपदी टिंगल करणारा, चतूर आणि बाष्कळ बडबड करणारा दिवाणजी जेव्हा राजकुमारी सत्यवतीला बोलवण्यात येते आणि विवाहासंबंधी तिला विचारले जाते तेव्हा ती स्वत:चा 'पण' त्यांच्यासमोर मांडते. तेव्हा दिवाणजीच तिला हा हट्ट चुकीचा असून तो सोडण्याचा आग्रह करतात. 'बाई, झोपडं बांधायला चार-आठ दिवस लागतात, घर बांधायला वर्ष-सहा महिने लागतात. एका रात्रीत तांबा पितळीची सात तळाची माडी कोण बांधणार ?' असे समजवतात. राजकुमारीचा हट्ट मान्य झाल्यानंतर दवंडी देण्याचे काम दिवाणजीकडे सोपवले जाते. पण दिवाणजी राजाकडून दवंडी देण्याचे प्रात्यक्षिक करवून घेतात आणि मगच दवंडी देण्यासाठी जातात. तेव्हा आजच्या सरकारी कचेरीतील / कार्यालयातील अस्सल कारकुनाचे मूर्तिमंत उदाहरण पहावयास मिळते.

दिवाणजी कुंभारवाड्यात दवंडी देऊन आल्यानंतर सावळा जेव्हा दरबारात विडा उचलण्यासाठी येतो तेव्हा सावळ्याचा सामना प्रथम दिवाणजींशी होतो. दिवाणजीच त्याला राजाशी कस वागावं ह्यासंबंधी सूचना देतात पण सावळा त्या मानत नाही. सावळा आणि राजा यांच्यात सुसंवाद घडविण्यास दिवाणजी महत्वपूर्ण भूमिका बजावतात. सर्व वगनाट्याप्रमाणेच या वगनाट्यातही राजा दिवाणजींच्या अकलेने चालताना दिसतो. सावळ्याकडून लिहून घेण्याचे आणि राजाकडून लिहून देण्याचे काम दिवाणजीच करतात.

दिवाणजींचा ताईसाहेबाना आणि राजकुमारी सत्यवतीलाही बऱ्यापैकी लळा आहे. राजकुमारीच्या लहानपणीच्या लुटू लुटू चालण्याचे दिवाणजींना आजही कौतुक वाटते. राजकुमारीच्या लग्नाची तयारी करण्याचा सर्व कार्यभार दिवाणजींवरच आहे. शेवटी लग्न लावून देण्याचेही कार्य स्वत: दिवाणजीच करतात.

डोक्यावर पुणेरी पगडी त्यातून डोकावरणारी तुकतुकीत शेंडी, उपरणे, धोतर, हातात काठी असा पोषाख परिधान करून दिवाणजी रंगमंचावर वावरतात. आपल्या हजरजबाबी आणि चतुर पण तिढ्यातील बोलण्याने दिवाणजी सर्वांचे लक्ष वेधून घेतात.

**राजा -**

मिथुला नगरीचा राजा, वधूपिता आणि गाढवाचा (चित्रसेन गंधर्वाचा) सासरा म्हणून राजा सत्यधर्म आपणासमोर येतो. आपल्या मुलीच्या / राजकुमारीच्या हट्टापुढे गुडघे टेकणारा पिता, तमाशातील राजाप्रमाणेच राजप्रशासनावर वचक नसणारा आणि दिवाणजींच्या अकलेने चालणारा थोडासा भोळा असा राजा आपणासमोर येतो.

या राजाच्या दरबारात दिवाणजी सोडले तर इतर दरबारी जवळ जवळ नसतातच. आपल्या वयात आलेल्या मुलीच्या लग्नाच्या विचाराने तो चिंतेत आहे आणि राजकुमारी सत्यवती त्याच्यासमोर हट्ट धरते. 'एका रात्रीत एका खांबावर सात तळांची तांब्या- पितळीची माडी बांधील त्याच्याशीच मी लग्न करीन. माडी बांधली नाही जगातले सगळे पुरूष... मला माझ्या बापासारखे आहेत' अशी अट / पण ठेवते. शेवटी बालहट्टापुढे राजहट्ट माघार घेतो. आणि राजा दिवाणजींना दवंडी देण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवून दवंडी देण्यास पाठवतो.

सावळा पैजेचा विडा उचलण्यासाठी येतो. तेव्हा सावळ्याकडून लिहून घेतल्यानंतर स्वत:ही भाबडेपणाने लिहून देतो की, सावळाचा मुलगा वेडा, दगड, गाढव असला तरीही आपण सत्यवतीचे लग्न त्याच्या सोबत लावून देऊ आणि सावळ्याला लिहून दिल्याप्रमाणे स्वत:च्या मुलीचा विवाह एका गाढवासोबत लावून देतो. हा विवाह लावत असताना त्याला फार हळहळ वाटत असते ती हळहळ तो स्वत:च्या मुलीजवळ व्यक्त करतो. 'मुली आमचं ऐकलं नाहीस आता तुला गाढवाबरोबर लग्न करण्याचा प्रसंग आला.' आणि सावळ्याच्या चतुरपणाबद्दल म्हणतो, 'या सावळ्या कुंभारानं गावगुंडी पेचात अडकवून फसवलं' राजकन्या गाढवासोबत लग्न करण्यास तयार होते तेव्हा 'दिवाणजी मुलीनं माझी इज्जत राखली.' अशा शद्बात मुलीविषयी अभिमान व्यक्त करतो.

भोळा, सरळमार्गी, प्रशासनावर वचक नसणारा दिवाणजींच्या सल्ल्याने वागणारा, स्वत:च्या शद्बाला जागणारा, स्वत:च्या मुलीचा हट्ट मान्य करणारा संवेदनशील हृदयाचा बाप म्हणून राजा सत्यवर्मा/ सत्यधर्म या वगनाट्यातून आपल्यासमोर येतो.

**राजकुमारी सत्यवती -**

मिथुला नगरीची राजकुमारी हट्टी स्वभावाची, स्वत:चेच म्हणणे खरे करणारी आणि कोणत्याही परिस्थितीत तडजोड न करणारी व्यक्तिरेखा म्हणजे राजकुवर / राजकुमारी सत्यवती. राजा सत्यवर्मा तिला तिच्या विवाहासंबंधी विचारणा करतो. तेव्हा ती 'एका रात्रीत, एका खांबावर, तांब्या- पितळीची, सात तळाची माडी जो कोणी बांधील त्याच्याशीच मी लग्न करीन.' असा विचित्र 'पण' ठेवते. तिच्या हट्टी स्वभावामुळे सत्यवर्माला तिचे म्हणणे मान्य करावे लागते. या राजकुमारीचे लहानपणीचे लुटू लुटू चालणे दिवाणी आजही विसरलेले नाहीत.

दवंडी दिल्यानंतर सावळा स्वत:च्या मुलाचा (गाढवाचे) प्रस्ताव घेऊन येतो आणि पैजेचा विडा उचलतो तसेच राजाकडून चतुरपणे लिहून घेतो की, 'माझा मुलगा गाढव आहे तरी राजाने आपली मुलगी सावळ्या कुंभाराच्या मुलाला दिली पाहिजे.' आणि खरोखरच गावाचे वऱ्हाड घेऊन येतो. तेव्हा राजकुमारी स्वत:च्या अटींची गाढवाने पूर्तता केल्याने स्वत:चा शद्ब न फिरवता जे नशिबात आहे ते स्वीकारते आणि गाढवासोबत लग्नाला तयार होते.

आपल्या मताशी ठाम राहणारी, नशिबात जे असेल त्याला सामोरे जाणारी, वडिलांचा मान आणि इज्जत राखणारी, हट्टी स्वभावाची बाणेदार राजकुवर/राजकुमारी सत्यवती आपणास पहायला मिळते.

**इंद्र -**

देवांचा राजा बृहस्पतीचा शिष्य आणि सावळ्याचा गुरूबंधू आपल्या देवदरबारावर प्रचंड दबदबा असणारे व्यक्तिमत्व म्हणजे इंद्र.

आपल्या गुरूचा (बृहस्पतीचा) आदर करणारा राजा इंद्र आपल्या गुरूबंधूचे म्हणजेच

सावळाचे स्वागत करतो. त्याला आलिंगन देण्यासाठी पाचारण करतो, पण सावळा त्याला असली हलकट सवय नसल्याचे सांगतो.

अप्सरा, रंभा यांना देवांच्या मनोरंजनासाठी नाचगाणे करण्याची आज्ञा देतो. पण जेव्हा रंभेचा हात धरून चित्रसेन गंधर्व संकेत भंग करतो आणि सर्व दरबाराचा अपमान करतो तेव्हा क्रोधित होऊन चित्रसेन गंधर्वाला शाप देतो, 'जा तू मृत्युलोकी गाढव होऊन फिरशील!'

सावळ्याने केलेल्या परखड वक्तव्याने खजिल होतो पण चित्रसेनाने माफी मागितल्यानंतर गुरूच्या आज्ञेने आपण दिलेल्या शापावर उःशाप देतो की, मिथुला नगरीचा राजा सत्यधर्म/सत्यवर्मा याची एकुलती एक कन्या सत्यवती हिच्याशी तुझा विवाह होईल आणि त्या विवाहात तू पूर्ववत होशील हा उःशापच 'गाढवाचं लग्न' हे वगनाट्य आकारास येण्यास कारण ठरते.

याशिवाय या वगनाट्यात ताईसाहेब म्हणजेच राजा सत्यवर्माची बहीण ही लग्नाची तयारी करताना आढळते, स्वर्गाचा द्वारपाल, स्वर्गातील देवगण, ढोलकीवाला अशी काही पात्रे आढळतात.

सर्व पात्रांच्या तोंडून येणाऱ्या संवादातून वगनाट्याच्या कथानकाला गती प्राप्त होते. यातील सर्वच पात्रे आपापल्या जागेवर आणि संवादासाठी चपखल आहेत. नाट्याचे भवितव्य त्या त्या नाट्यातील पात्रांवर अवलंबून असते. त्यानुसार उपरोक्त सर्वच पात्रे/व्यक्तिरेखा अद्वितीय आहेत.

## ड) रसनिर्मिती -

प्रेक्षकांच्या मनावर खोलवर परिणाम करून त्याच्या भावनांना आवाहन करण्यात तसेच मनामध्ये वेगवेगळे भाव जागृत करण्यात जे नाट्य यशस्वी ठरते ते नाट्य रसिकमनावर अधिराज्य गाजवत असते. रसिकाच्या मनामध्ये वेगवेगळे रस परिपुष्ट करून त्याला भावविवश करणाऱ्या नाट्यकृतीच यशस्वी होत असतात. भरताच्या रससूत्रानुसार विभाव, अनुभाव,

व्यभिचारीभाव यांच्या संयोगातून रसनिष्पित्ती होत असते. तसेच आलंबन विभाव आणि उद्दिपन विभाव यांच्या योग्य संयोगातुन रसनिष्पत्तीला पूरक वातावरण प्राप्त होत असते. कोणतीही नाट्यकृती त्यामध्ये कोणते रस किती परिणामकारकतेने परिपुष्ट झालेले आहेत यावर यशस्वी होत असते. रंगमंचावर घडणारा प्रसंग प्रेक्षकाला स्वत:च्या जीवनात घडत आहे असा अनुभव प्राप्त करून देणारे नाट्य यशस्वी रसनिर्मिती घडवून आणते. नाट्यामध्ये नवरसांना अनन्यसाधारण महत्व असले तरी संपूर्ण नाट्यकृतीचा एक रस आणि प्रसंगपरत्वे परिपुष्ट होणारे इतर रस यांच्या योग्य मिश्रणाने प्रेक्षकास एक वेगळाच आणि हवाहवासा अनुभव प्राप्त होतो.

लोकरंगभूमीवरील वगनाट्याचे गंभीर आणि रंजक असे दोन प्रकार पडतात. पैकी गंभीर वगनाट्यामध्ये विनोदाला फारसे महत्व नसते. परंतु रंजक वग नाट्याचा विनोद हाच आत्मा असतो. हजरजबाबीपणाने विविध प्रसंगांमध्ये जीव ओतावा लागत असतो. बदलत्या काळाचे संदर्भ योग्य रीतीने योग्य ठिकाणी योजून विनोद निर्माण करावा लागतो. याचा अर्थ रंजक वगनाट्यामध्ये इतर रस नसतात असा नाही परंतु इतर रसासोबत हास्य रसाला अधिक महत्व असते कारण रसिकांचे निखळ मनोरंजन करण्याचे सामर्थ्य हास्य रसात अधिक प्रमाणात असल्याचे जाणवते.

प्रस्तुत 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यात अद्‌भूत, रौद्र, शृंगार, भय, करूण इ. रस तर आहेतच परंतु या रसासोबत हास्यरसाचे निर्विवाद साम्राज्य प्रस्तुत वगनाट्यावर असल्याचे जाणवते.

रंगमंचावर प्रवेश करतानाच सावळा

'दारिद्रय मरण यातूनी मरण बरे बा दरिद्रता खोटी ।
मरणात दु:ख थोडे दारिद्रयात व्यथा असे मोठी ।

ही काव्यपंक्ती म्हणतच प्रवेश करतो. तेथे सुरवातीलाच स्वत:ची व्यथा या काव्यपंक्तीद्वारे व्यक्त करतो. तेथे करूणरस, परिपुष्ट होतो. तसेच चित्रसेन इंद्राला शरण आल्यानंतर बृहस्पतीला त्याची दया येते. त्या प्रसंगातही करूणरस परिपुष्ट होतो.

बृहस्पतीच्या तोंडून 'प्रभूचं ध्यान ते माझं समाधान' या वाक्यातुन भक्तीरस परिपुष्ट होतो. तर चित्रसेननाने रंभेचा हात धरल्यानंतर इंद्राला प्रचंड राग येतो आणि तो चित्रसेनाला शाप देतो तेव्हा रौद्र रस परिपुष्ट होतो.

'गाढवाचं लग्न' या वगनाट्याच्या नावापासूनच या वगनाट्यात अद्‌भूत रसाचे प्रमाण लक्षणीय असल्याचे आढळून येते. एका गाढवाचं लग्न राजकुमारीबरोबर ही संकल्पनाच अद्‌भूत आहे. तसेच बृहस्पतीबरोबर सावळा गाईचे शेपूट धरून स्वर्गात जातो तो प्रसंग, चित्रसेन गंधर्वाने रंभेचा हात धरल्याने इंद्राने त्याला 'मृत्यूलोकी गाढव होऊन फिरशील' हा दिलेला शाप, 'मिथुला नगरीचा राजा सत्यधर्म किंवा सत्यवर्मा याची राजकन्या सत्यवती हिच्याशी तुझा विवाह होईल आणि तू पूर्ववत होशील' हा दिलेला उ:शाप हे दोन्ही प्रसंग अद्‌भूतच आहेत तसेच गाढवाने एका रात्रीत एका खांबावर, सात तळाची, तांब्या पितळची माडी बांधणे आणि राजकुमारीशी विवाह होताच गाढवाचे रूपांतर चित्रसेन गंधर्वामध्ये होणे या प्रसंगातही अद्‌भूत रस परिपुष्ट होतो.

करूण, भक्ती, अद्‌भूत, रौद्र रसासोबतच रंजक वगनाट्याचा आत्मा असणारा रस म्हणजे हास्यरस या रसाचे साम्राज्य संपूर्ण वगनाट्यात पहावयास मिळते. सुरवातीलाच गंगी स्वत:ची ओळख 'तुमच्या बापानं करून दिलेली' अशी सांगते. बृहस्पतीशी संवाद साधताना 'पाय धरून काय करणार ?' या बृहस्पीच्या प्रश्नाला 'तुला दगडावर आपटणार' हे सावळाने दिलेले उत्तर, 'बुवा तुला कुनी बायको देत नाही का रे ?' हा सावळाने विचारलेला प्रश्न, बृहस्पती हा साधू म्हणून सादुचा येदुशी, दादुशी म्हादुशी जोडलेला संबंध 'देह परोपकारासाठी झिजवला पाहिजे.' या वाक्यावर केलेली कोटी, बृहस्पतीची कफनी उचलून आत काय नेसले आहे का? ही केलेली चौकशी स्वत:ला गुरूचे पारडू, करडू, शेरडू म्हणवून घेणे आणि गुरूला बाटल्या म्हणणे. बृहस्पतीला 'तू हाटेलात उदार खातो काय?' म्हणणे, शांती ठेवणे याचा अर्थ शांती नावाची स्त्री ठेवणे असा घेतलेला अर्थ, गंगीला 'मरस्तवर रंडकी रहा' हा दिलेला आशीर्वाद, तिला लुगडं सोडून बुचकोट (बुशकोट) घालण्याचा आग्रह धरणे तसेच दिवाणजी आणि राजा, दिवाणजी आणि राजकुमारी सत्यवती यांच्यातील सर्वच संवाद तसेच

सावळा, दिवाणजी, दिवाणजी-ढोलकीवाला यांच्यातील सर्व संवाद.

गंगी आणि गाढवाने माडी बांधण्यावरून सावळ्याची केलेली थट्टा, 'मोठं घर पोकळ वासा, वारं जाई भसाभसा' या गंगीच्या म्हणीचा घेतलेला सरळ अर्थ, मंगलाष्टका म्हणताना मधूनच दिवाणजींनी व्हॉ, व्हाँ, व्हाँ करणे आणि व्हाँ, व्हाँ चे कारण गाढवाचा मंगल गाढवास समजावा हा केलेला युक्तीवाद अशा अनेक संवादातुन, प्रसंगातुन पात्रांनी केलेल्या अभिनयातुन आणि अतिशयोक्तीतुनही वगनाट्यात हास्यरस अवतरला आहे. पात्रांच्या परस्पर संबंधातील विक्षिप्ततेतुनही हास्यरस उत्पन्न झाला आहे.

एकूण वगनाट्यातुन अभिव्यक्त झालेले सर्वच रस प्रेक्षकांच्या किंवा रसिकांच्या मनाची पकड घेतात. या वगनाट्यात इतर रसापेक्षा हास्यरस अत्यंत प्रभावीपणे व्यक्त होतो आणि प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन करतो.

## ई) भाषाशैली -

तमाशातील रंजक स्वरूपाचे वग आणि गंभीर स्वरूपाचे वग यातील 'सावळा कुंभार' या रंजक वगापासून निर्माण झालेल्या 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याचे मूळ कथानक 'श्री नवनाथ भक्तिसार' ग्रंथातील लोककथेवर आधारीत आहे. या वगनाट्याची भाषाशैली पूर्णपणे विनोदी आणि द्व्यर्थी संवादाने भरून उरलेली आहे. त्या द्व्यर्थी संवादांशी हातात हात घेऊनच वगनाट्याचे कथानक गती घेताना दिसते. संवादांची भाषा ही बहुतांशी ग्रामीण बोलीभाषा आहे कारण वगनाट्यातील प्रमुख व्यक्तिरेखा ह्या खेड्यामध्ये राहणाऱ्या आहेत. त्यात जातीने कुंभार असल्याने त्यांच्या तोंडी ग्रामीण भाषाच येणार. उदा.

गंगी : कारभारी- कारभारी- आला का ? या घरात.

सावळा : क्कान् हाय ग, क्कान् हाय ग- कु कू.

गंगी : मी तुमचीच.

सावळा : कोन, चुलती काय?

गंगी : अहो, चुलती नाय, मी तुमची लाडकी.

सावळा : लाडकी म्हणजे बैठकीची बहीन.

गंगी : अहो, ती पन नाय...

सावळा : मग कोन ?

गंगी : अहो, तुमच्या बापानं करून दिलेली.

सावळा : म्हनजे कोन गंगी काय? गंगे, काय म्हनती ?

पहिल्या प्रवेशात सुरवातीचा हा प्रसंग म्हणजे अस्सल ग्रामीण भाषेचा मूर्तिमंत नमुनाच आहे. ग्रामीण भाषेला अनुसरूनच म्हणींचा वापरही केलेला आढळतो. विशिष्ट प्रसंगातील स्थितीचे वर्णन अचूक आणि यथार्थ घडवण्याचे सामर्थ्य या म्हणीमध्ये दिसते आणि प्रसंगाला अनुसरूनच या म्हणी आल्याचे आढळतात. उदा. मावळण ताट घेऊन ओवाळण्यासाठी ताईसाहेब येतात तेव्हा -

गंगी : काय हो बाई, ताट कश्याचं आहे ?

तो : ताट आहे पितळेचे. निरांजन आहे पितळेची.

गंगी : काय? पितळेच ताट ! मोटं घर पोकळ वासा, वारं जाई भसाभसा.

या संवादात 'मोटं घर पोकळ वासा, वारं जाई भसाभसा' या म्हणीतून राजकन्येच्या लग्नातील ताट पितळच आहे ते किमान सोन्याचे किंवा चांदीचे असावे अशी गंगीची अपेक्षा फोल ठरते आणि राजाचा व राजवाड्याचा डामडौल नुसता दिसण्यापुरताच आहे याचीही कल्पना येते. अशा बोलक्या म्हणींचा वापरही केलेला आहे.

बृहस्पती, इंद्र, चित्रसेन, राजा, दिवाणजी या पात्रांच्या भाषेत मात्र प्रमाणभाषेचा वापर केला असल्याचे आढळून येते. तसेच उच्चवर्णीय शहरी पांढरपेशा भाषेचे संस्कारही त्यांच्या भाषेवर झालेले आढळतात. उदाहरणार्थ- सावळा इंद्र दरबाराच्या बाहेर तिष्ठत असताना दरबारात इंद्र आणि बृहस्पतीचा संवाद

इंद्र : गुरूवर्य, बाहेर कसली गडबड चालली आहे ?

बृहस्पती : देवेन्द्रा, तुला सांगायला विसरलो, बाहेर तुझा गुरूबंधू आला आहे.

इंद्र : काय, आमचे गुरूबंधू? द्वारपाल, ते आमचे गुरूबंधू आहेत त्यांना आज्ञा आहे.

रंभेचा हात धरल्यानंतर पश्चात्ताप व्यक्त करताना चित्रसेनाने इंद्राशी साधलेला संवाद.

इंद्र : देवांच्या समोर रंभेचा हात धरून तू देवांचा अपमान केला आहेस म्हणून मी तुला शाप देतो, जा, तू मृत्यूलोकी गाढव होऊन फिरशील!

चित्रसेन : नका, देवाधिदेवा,नका कठोर शाप देऊ नका. सहज गंमत म्हणून मी रंभेचा हात धरला, मला उ:शाप द्या.

सावळा पैजेचा विडा उचलण्यासाठी दरबारात येतो तेव्हा सावळा, राजा आणि दिवाणजी यांच्यातील संवाद. दिवाणजींनी राजाशी कसं बोलायचं कसं वागायचं हे सांगितल्यानंतरही.

सावळा : राम राम.

रजा : राम राम. दिवाणजी, काय वेडा माणूस आहे हा ! राजाला लवून मुजरा करायचा असतो. हा चावडीत आल्यासारखा म्हणतो राम राम.

दिवाणजी : खेड्यातला माणूस आहे. घ्या सांभाळून.

राजा : बरोबर आहे. सावळा कुंभार, राम राम.

या संवादातून शहरी पांढरपेशेपणाचे दर्शन घडते.

भाषाशैलीमध्ये द्व्यर्थी संवादांचा वापरही केलेला आहे. उदाहरणार्थ - 'दुसऱ्यासाठी देह झिजवला पाहिजे.' या म्हणण्याचा अर्थ वास्तविक पाहता दुसऱ्याच्या कामासाठी उपयोगी आले पाहिजे असा असताना देह झिजवण्याचा संबंध टी. बी. शी लावला जातो.इंद्र सावळ्याला आलिंगन देण्यासाठी पाचारण करतो तेव्हा सावळा आलिंगनासच हलकट सवय मानतो. सावळा गंगीला सांगतो की तो बुवाबरोबर स्वर्गात गेला होता, तेव्हा गंगीला सावळाने बुवा ठेवलेला आहे असेच वाटते. दिवाणजी राजाला राजकन्येचे लग्न एखादं मूल झाल्यानंतर करा असे सांगतो व पुढे पुष्टी जोडतो तुम्हाला (राजाला) मूल झाल्यानंतर.दिवाणजी राजकुमारीला

हट्ट सोडायला पाहिजे असे न सांगता 'बाई, सोडायला पाहिजे' असे म्हणत असतो तेव्हा राजासह प्रेक्षकांच्याही मनात हट्ट ऐवजी बाई सोडायला पाहिजे असाच अर्थ येतो. सावळा सही ऐवजी सई ऐकून स्वतःच्या आईची आठवण काढतो. 'सावळ्या शाळेत गेलेलास का?' असे विचारल्यानंतर सावळा प्रामाणिकपणे हो म्हणून सांगतो आणि 'धर्मशाळेत गेल्याचे सांगतो.

दोन बायका करायच्या नाहीत. ह्यो कायदा मानसाला आहे. जनावराला नाही, कळलं का? येथे जनावर या शब्दात दोन बायका करणारे पुरूष जनावरासारखेच आहेत असाही अर्थ व्यक्त होतो. अशा प्रकारे अनेक द्व्यर्थी संवाद या वगनाट्यातून व्यक्त होतात त्यातुन विनोदनिर्मिती होते.

सावळाला बृहस्पती शांती ठेवण्यास सांगतो तेव्हा आणि सावळाला द्वारपाल तुला देव आज्ञा आहे असे सांगतो तेव्हा श्लेष अलंकाराचा वापर असल्याचे जाणवते कारण शांती म्हणजे शांतता आणि शांति म्हणजे शांति नावाची स्त्री तसेच देवआज्ञा म्हणजे देवाची आज्ञा आणि देवाज्ञा म्हणजे मरण असे अर्थ व्यक्त होत असल्याने येथे श्लेष अलंकार साधलेला आहे.

काही संवादात इंग्रजी शब्दांचा वापर विनोदनिर्मितीसाठी केलेला आहे. उदा.

ढोलकीवाला दिवाणजींना म्हणतो, ''माझा जोडीदार शीक झालाय'' तेव्हा दिवाणजीही म्हणतात, ''तो शीक झाला म्हणून बरं झालं. मराठी असता म्हणजे दाखवलं असतं...'' येथे शीक या शब्दाचा अर्थ इंग्रजी भाषेत आजारी पडणे असा न घेता मराठीत शीख धर्म स्वीकारला असा घेण्यात आला आहे. सावळ्याला गंगी गाढवाला ठेवायचा अन् नवऱ्याला कॅन्सल करण्याची भाषा करते तेव्हा सावळा म्हणतो, ''ओ.. माझं झालं सर्व्हिस म्हणजे मला कर कॅन्सल. मग मी बसून खाईल पेन्सल.'' अशा प्रकारे कॅन्सल, पेन्सल अशा शद्वातुन यमकही साधलेला आहे. त्याबरोबर विनोदनिर्मितीही करण्यात आली आहे.

दारिद्रय मरण यातूनही मरण बरे बा दरिद्रता खोटी ।
मरणात दुःख थोडे दारिद्रयात व्यथा असे मोठी ॥

सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो
कलंक मतीचा झडो, विषय सर्वथा न आवडो.
मना कर्मयोगे जगी जन्म झाला
परी शेवटी काळ मोखी निमाला
मरे एक त्याचा दुजा शोक वाहे.
अकस्मात तोही पुढे जात आहे.

परधन मानावे जैसे वमन्, परस्त्री मातेसमान जान ।
हे चित्र ठेवूनिया समाधान, तिर्थेपट्टने धुंडावी ॥
संतांच्या विभूत जगाच्या कल्याना.. देह तिस्टाविती परोपकारे.

अशी संतवचने, ओव्या, श्लोक, यांची पखरण अधूनमधून सावळा, बृहस्पती यासारख्या पात्रांच्या तोंडून केलेली आढळते. यातून प्रेक्षकांना आणि वाचकाना बोध घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे.

देवा कोणाशी म्हणावे, वर्म कळेना गुरूकिल्ली,
बरा देव राहिला बाजूला आणि तुम्ही पोथीपुराण वाचून बरळली.
कृष्णाला जर देव म्हणावे तर त्याने गौळणींची थट्टा केली,
रामाला जर देव म्हणावे तर तो चंद्रसेनेच्या गेला महाली,
विष्णूला जर देव म्हणावे तर सती वृंदा डागाळली,
ब्रह्मदेवाला जर देव म्हणावे तर त्याने पोटची कन्या नाही ओळखली.

असे विविध देवतांच्या वागण्याचे दाखलेही आलेले आहेत.

वगनाट्यातील अनेक प्रसंग एकमेकांना सांधण्यासाठी लालित्य पूर्ण छबकड / छक्कड रचना ही करण्यात आलेली आहे. उदा. - तेव्हा चित्रसेन गाढव झाला, तो आजाऱ्यात भटकत गेला, फिरत मिथुला नगरीला...

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वगनाट्यात हजरजबाबीपणाचा प्रत्यय घडोघडी येतो. त्यामुळे वाचकांचे मनोरंजन होते. प्रेक्षकांच्या / वाचकांच्या मनाची पकड घेण्याचे सामर्थ्य वगनाट्याच्या भाषाशैलीत आहे.

**फ) परिणामकारकता -**

मराठी मातीशी नाते सांगणाऱ्या तमाशा या रंजक कला प्रकारावर महाराष्ट्रातील लोकांनी पिढ्यान् पिढ्या प्रेम केले. कितीही मोठ्या संख्येने प्रेक्षकवर्ग उपस्थित असला तरी एकदा ढोलकीवर/हलगीवर थाप पडू लागली. साथीला पायातील चाळांचा आवाज, झांज/टाळ आणि तुणतुणे असले की सर्वच प्रेक्षकांचे चित्त वेधून घेतले जाते आणि प्रेक्षकवर्ग तल्लीन होतो. या तमाशातूनच पुढे वगनाट्य अस्तित्वात आले. हे आपण पाहिलेच आहे. त्यामध्ये प्रचंड आवाहकता आणि लोकप्रियता तसेच रंजनसामर्थ्य होते.

प्रस्तुत 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याने 'दादू इंदुरीकर' यांच्यासारखा वगसम्राट सोंगाड्या विस्मृतीच्या अंधारातून उजेडात आणला आणि त्याला राष्ट्रपतीपदकापर्यंत नेऊन पोचवत अफाट लोकप्रियता आणि पु. ल. देशपांडे, बाळासाहेब देसाई, बाळासाहेब ठाकरे, शिरीष पै, यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी, वसंतराव नाईक यासारख्या अनेक दिग्गजांच्या शुभेच्छा आणि आशीर्वाद या वगनाट्याला प्राप्त झाले. प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याचे अनोखे सामर्थ्य आणि प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य करण्याचे कसब प्रस्तुत वगनाट्यात आढळते.

वगनाट्याच्या सुरवातीलाच स्वकर्माची फळे स्वत:ला भोगावीच लागतात. हा बोधही घडवून आणला आहे. तीन ते साडेतीन तास प्रेक्षकांना सतत हसत ठेवून मनोरंजन करणारी अपूर्व नाट्यकृती म्हणजे 'गाढवाचं लग्न' सावळा रंगमंचावर प्रवेश करतानाच

दारिद्रय मरण यातूनि मरण बरे बा दरिद्रता खोटी ।
मरणात दु:ख थोडे दारिद्रयात व्यथा असे मोठी ॥

ही स्वत:ची व्यथा मांडतो तेव्हा प्रेक्षकवर्गाचीही ती व्यथा असते. कारण आजही दारिद्रय आणि मरण यापैकी मरण किंवा आत्महत्या हा मार्ग स्वीकारणारे अनेक लोक समाजामध्ये दिसतात. चांगल्या संगतीचेही महत्व सावळाने 'सुसंगती सदा घडो' या मोरोपंतांच्या श्लोकातून सांगितलेले आहे.

'मग बुवा तुला ध्यान  नाही होत का? ' यासारख्या बृहस्पतीला विचारलेल्या प्रश्नातून मानवी प्रवृत्तीवरही बोट ठेवले आहे. तर प्रपंच करून परमार्थ जोडण्याचा उपदेशही लोकांना केलेला आहे. सामाजिक प्रवृत्तींच्या दर्शनातून प्रेक्षकांच्या मनावर परिणाम घडविण्याचा प्रयत्न केला आहे.

संवादातून हजरजबाबीपणा, वाक्चातुर्य आणि द्व्यर्थी शद्बांच्या माध्यमातून घडोघडी विनोदनिर्मिती करून प्रेक्षकांना हास्यरसात न्हाऊ घातले आहे. परंतु चित्रसेन रंभेचा हात धरतो तेव्हा इंद्राचा दरबार रंडीबाज म्हणूनही हिणवला आहे. गंभीरपणे कृष्ण, राम, विष्णु, ब्रह्मदेव यांच्या वागण्यावर भाष्य केले आहे. येथे मात्र प्रेक्षकांना देवांच्या वागण्यातील विसंगती आणि कामुकता लक्षात येते. तेव्हा प्रेक्षक विचारप्रवृत्त होतो. वास्तविक पाहता हिंदू धर्मातील देवतांवर ही एक प्रकारची टीका असूनही प्रेक्षकांनी आणि सर्व समाजानेही ती स्वीकारली हे विशेष होय. या टिकेमुळे अद्यापही कुणाच्याच भावना दुखावल्या नाहीत हे प्रसंगावधानाने केलेल्या निवेदनाचे यश होय.

बृहस्पतींनी केलेल्या मध्यस्थीने चित्रसेन गंधर्वाला इंद्राकडून उःशाप मिळतो, तेव्हा सर्व प्रेक्षकांनाही एकाच वेळी सुखद आणि धक्का देणारा अनुभव प्राप्त होतो.

राजा आणि दिवाणजी, सावळा आणि राजा, सावळा आणि दिवाणजी यांच्यातील द्विअर्थी संवादातून प्रेक्षकांमध्ये प्रचंड हंशा पिकतो. सावळा आणि स्वर्गाचा द्वारपाल तसेच सावळा आणि दिवाणजी यांच्यातील काही संवादातून प्रेक्षकांना प्रशासकीय / सरकारी कार्यालयातील शिपाई आणि कारकून यांच्या कामानिमित्त गेल्यानंतर जसा भ्रष्टाचाराचा आणि उद्धटपणाचा अनुभव येतो तोच अनुभव येथे रंगमंचावरून व्यक्त होतो.

राजकुमारी सत्यवती उपवर झाली हे सर्वच प्रेक्षकांना मान्य होते. पण एखादं मूल झालं म्हणजे लग्न करा. या दिवाणजींच्या सल्ल्याने प्रेक्षकांमध्ये हशा पिकतो कारण त्याचा सरळ अर्थ 'सत्यवतीला मूल झाल्यानंतर' असाच प्रेक्षकांकडून घेतला जातो. पण दिवाणजी पुढे सांगतात की, राजाला मूल झाल्यानंतर तेव्हा या पुढच्या स्पष्टीकरणामुळे प्रेक्षकही प्रचंड खुश होतात. राजा दिवाणजींना दवंडी देण्याचे काम सांगतो. तेव्हा राजाला दवंडीचे प्रात्यक्षिक

करून दाखवायला लावणारा दिवाणजी म्हणजे प्रशासकीय कारकूनाचा उत्तम नमुनाच पहावयास मिळतो.

सावळा दिवाजींना विचारतो तू पैसे चिकार खात असशील तेव्हा सरकारी कार्यालयातील चाललेल्या भ्रष्टाचाराचे चित्र उघड होते आणि लोकांना, तो नित्याचा अनुभव असल्याने पटतेही.

राजा स्वत:च्या कन्येचे सत्यवतीचे लग्न एका गाढवाशी लावून देण्यास तयार होतो आणि मान्य करतो की, 'सावळ्या कुंभारानं गावगुंडी पेचात अडकवून फसवलं.' तेव्हा ग्रामीण भागातील प्रेक्षकांना ग्रामीण माणसांच्या चतुरतेचा नकळत अभिमान वाटतो. सावळा 'दोन बायका करायच्या नाहीत, ह्यो कायदा मानसाला आहे. जनावराला नाही, कळलं का ?' हा प्रश्न विचारून दोन बायका करणाऱ्या प्रेक्षकांना थोडासा चिमटाही काढतो. दिवाणजी मंगलाष्टका म्हणत असताना मधूनच व्हाँ, व्हाँ, व्हाँ असे करतात आणि तसे करण्याचे कारण सांगतात की गाढवाला मंगलाष्टका समजली पाहिजे हा दिवाणजींचा युक्तीवाद प्रेक्षकांनाही पटतो व प्रेक्षकांमध्ये हंशा पिकतो.

'गाढवाचं लग्न' प्रचंड परिणामकारक वगनाट्य असून प्रेक्षकांना पोट धरून हसायला लावणारे रंजक वगनाट्य आहे. रंजक वगनाट्य असूनही काही ठिकाणी प्रेक्षकांना नीतीबोध शिकविणारे, हसता हसता अंतर्मुख करणारे आणि विचारप्रवृत्त व्हायला भाग पाडणारे वगनाट्य आहे. एकूण प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन घडवून आणणारे आणि हास्यरसाची उधळण करणारे मराठी लोकरंगभूमीवरील अजरामर वगनाट्य म्हणजे 'गाढवाचं लग्न' आहे.

## ग) विनोद -

'गाढवाचं लग्न' हे वगनाट्य 'श्री नवनाथ भक्तिसार' ग्रंथातील २५ व्या अध्यायावर आधारीत आहे. वास्तविक पाहता 'श्री नवनाथ भक्तिसार' हा ग्रंथ नीतीबोध शिकवणारा आणि प्रबोधन घडवून आणणारा, थोडासा गंभीर ग्रंथ असला तरी 'गाढवाचं लग्न' हे वगनाट्य निखळ मनोरंजन करणारे वगनाट्य आहे. प्रेक्षकांना मनापासून हसवणारे अनेक

संवाद, दोन घटनामधील कार्यकारण भावाचा अभाव, पात्रा-पात्रांतील विक्षिप्त परस्परसंबंध, अतिशयोक्त घटना प्रसंगांचे चित्रण यातून संपूर्ण वगनाट्याला प्राप्त झालेले विमुक्त स्वरूप या सर्व गुणांमुळे 'गाढवाचं लग्न' प्रेक्षकांमध्ये प्रचंड हंशा पिकवते. घडोघडी विनोदाची पखरण संपूर्ण वगनाट्यात करण्यात आलेली आहे. शाद्बीक विनोद आणि प्रसंगनिष्ठ विनोद अशा प्रकारचे विनोद आपणास पहावयास मिळतात.

'गाढवाचं लग्न' या वगनाट्यामध्ये विनोदाचे निर्विवाद साम्राज्य असल्याचे निदर्शनास येते. बृहस्पती आणि सावळा यांची भेट झाल्यानंतर

सावळा : अरं सकाळीच देवाजवळ प्रार्थना केली. चांगल्या मानसाच दर्शन घडू दे. त्याप्रमाणं झालंय, बुवा तुझं पाय मी नाही सोडणार.

बृहस्पती : पाय धरून काय करणार ?

सावळा : तुला दगडावर आपटणार !

वास्तविक पाहता बृहस्पतीशी असे बोलणे संकेतभंग करणारे आहे. पण यातून विमुक्ततेचा प्रत्यय येतो आणि विनोदनिर्मिती होते. तसेच सावळाने बृहस्पतीला, "तुला लगीन करायचं ध्यान होत नाही का?" विचारणे किंवा लग्न करत नाही म्हणून बृहस्पतीत काही तरी दोष असला पाहिजे असे म्हणणे यातून विनोदनिर्मिती होते. गुरूमंत्र देत असताना बृहस्पती कानात थुंकला असे सावळ्याला वाटते आणि सावळा म्हणतो.

सावळा : अरेरे मंत्र फुकला का कानात थुंकला आग लागली तुझ्या मंत्राला असा कानात थुंकला नि कान बहिरा करून टाकला. उद्या डॉक्टरकडं जर गेलो तर डॉक्टर दवाखान्यात उभं करणार नाही. डॉक्टर म्हणेल दुसरा मानुस तुझ्या कानात थुंकतोपर्यंत तू काय करत होतास ? मग काय सांगू ?

या वाक्यातूनही विनोदनिर्मिती होते.

बृहस्पती, "आजपासून मी तुझा गुरू, आन् तू.." असे म्हणताच सावळा स्वत:ला "पारडू,

चिमुकलं करडू... शेरडू'' म्हणवून घेतो तेव्हाही विनोद निर्माण होतो.

बृहस्पती आणि सावळा इंद्रसभेत जातात तेव्हा,

बृहस्पती : सावळा, तू भूतलावर जो वेडेपणा केलास तो इथं चालणार नाही. मी तुझा गुरू आहे. सांगल तस वागावं लागलं.

सावळा : जरूर वागलं.

बृहस्पती : मग आपण आजपासून शांती ठेवायची.

सावळा : कुनी ?

बृहस्पती : आपण दोघानी.

सावळा : आता माझ्या ध्यानात आलं....

बृहस्पती : काय ?

सावळा : आरं तू का लगीन करीत नाही ते... !

बृहस्पती : (सावळाचा कान पकडून म्हणतो) भलताच अर्थ केलास.

या संवादात शांती या शद्बाचा शांतता असा अर्थ न घेता शांति नावाची स्त्री असा अर्थ घेतलेला असल्याने श्लेष अलंकाराच्या माध्यमातून विनोदनिर्मिती घडवून आणली आहे.

इंद्र सावळाला गुरूबंधू या नात्याने आलिंगन देण्यासाठी पाचारण करतो तेव्हा सावळा त्याला म्हणतो, 'ती हलकट सवय मला नाही !' तेव्हाही सावळाच्या अज्ञानामुळे / गैरसमजामुळे झालेला विनोद पहावयास मिळतो.

गंगी स्वर्गातून आलेल्या सावळाच्या पाया पडते तेव्हा आशीर्वाद म्हणून सावळा 'जा मरस्तवर रंडकी राहा' हा आशीर्वाद देतो आणि विनोद निर्माण होतो. तर गंगी सावळाला विचारते की तुमचे आणि माझे आईबाप स्वर्गात कसे आहेत? तेव्हा सावळा 'माझं आईबाप पुण्यशील ते तपाला बसले आहेत, पण तुझं आईबाप नरकाच्या गाड्या ओढतात'. या विरोधाभासातून आणि गंगीच्या प्रतिक्रियेतून विनोद निर्माण होतो.

सावळा गंगीला सांगतो की तो बुवासंग स्वर्गात गेला होता. तेव्हा गंगी म्हणते बुवा?

तरी म्हटलं तुम्ही चार चार दिवस घरी का येत नाही तर बुवा ठेवलाय?

या गैरसमजावरूनही विनोद निर्माण होतो.

गंगी लाडात येते तेव्हा

गंगी : कधीच्या काळाला मी लाडाला आले अन् तुम्ही तर पटापट पडायला लागलात ?

सावळा : तुला हजार वेळा सांगितलं की मी पटापट पडायला लागलो तर तू लाडाला येऊ नको म्हणून तुम्हा बायकांना लई वाईट सवय. लाडाला यायचं यायचं अन् पटकन ढकलून जायचं.

या बायकांच्या लाडाला येण्यावर केलेल्या भाष्यामुळे विनोद निर्माण होतो.

दिवाणजी महाराजाना इज्जतीविषयी समजावता समजावता "आता आपणाला इज्जतच नाही..." असे म्हणतात तेव्हाही संकेतभंग होऊन विनोदनिर्मिती होते.

कधी कधी दिवाणजी राजकुमारीसाठी "बोल बोल बाई बोल मी तुझा बाप आहे" असे स्वत: म्हणून मग राजाला तसे म्हणण्याची विनंती करतात तेव्हाही विनोदनिर्मिती होते. तर कधी राजाला दवंडी द्यायला लावून "चला पुढच्या चौकात" असे म्हणतात, तेव्हा राजाला दवंडीवाला समजून विनोदनिर्मिती होते.

ढोलकीवाला : जोडीदार शीक झालाय.

दिवाणजी : तो शीक झाला म्हणून बरं झालं. मराठी असता म्हणजे दाखवलं असतं.

प्रस्तुत संवादातून इंग्रजी शद्बाचा आधार घेऊन विनोदनिर्मितीचा यशस्वी प्रयत्न दिसून येतो. तर दिवाणजी- सावळ्याला राजकुमारीचा पण सांगून शेवटी तशी माडी बांधील तोच तिचा नवरा, नाही तर जगातील सगळे पुरूष... तिच्या बापासमान असे म्हणतो तेव्हा

सावळा : जगात पुरूष आहेत किती ?

दिवाणजी : पुष्कळ आहेत.

सावळा : मग विचार करा. आमचा नंबर कधी लागायचा ?

असे विचारतो तेव्हा हा नंबर कशासाठी आहे हे ओळखून प्रेक्षकांत प्रचंड हंशा पिकतो. येथे स्त्री-पुरुष संबंधाचा विनोदासाठी वापर केल्याचे आढळून येते.

दिवाणजी : राजा जवळून दहा पावलांच्या अंतरावर उभं राहायचं राजाजवळ उभं राहायचं नाय.

सावळा : काहो ? तुज्या राजाला काय रोग आहे काय ?

दिवाणजी सावळाला अदबीनं वागायचं सांगत असतात तर सावळा त्याचा संबंध रोगाशी जोडतो. त्यामुळे विनोद निर्माण होतो. तसेच सावळ्याकडून लिहून घेतल्यानंतर सही करायला सांगितले जाते तेव्हा सावळा सही ऐवजी सई समजून स्वत:च्या दिवंगत आईच्या आठवणीने विनाकारणच शोकाकूल होतो.

दिवाणजी सहीचा नाद सोडून सावळाला अंगठा मागतात तेव्हा हाताचा अंगठा देण्याऐवजी पायाचा अंगठा देतो. हाताचा अंगठा वर करून अंगठा दे असे दिवाणजी सांगतात तेव्हा सावळा खाली झोपतो आणि अंगठा वर करतो येथे दृश्य विनोद साकार होतो.

गाढवाने बांधलेली माडी पाहण्यासाठी सावळा आणि गंगी जातात तेव्हा

सावळा : त्या वरल्या सहा ताळ्या वजनानं खालचा ताल कसा बुघतोय.

गंगी : अहो, तो बुघत नाही. खालच्या तळात पिठाची गिरण आहे ती सारखी कुक कुक कुक करते.

वास्तविक पाहता वरच्या सहा ताळ्याच्या वजनानं खालचा ताळ बुघतही नसतो आणि त्यात पिठाची गिरणही नसते पण काढल्या गेलेल्या तर्क वितर्कामुळे विनोदनिर्मिती होते. तिच माडी राजा आणि दिवाणजी बघतात आणि

दिवाणजी : काय हे नवल? बाप रे बाप ....

सावळा : किती बाप ? बापाचा बंडल बांधतो का ?

या विधानाने विनोदनिर्मिती होते. गाढवासोबत राजकुमारीचे लग्न लावले जात असताना.

दिवाणजी : बाई, नवरदेवाला हात नाही, तुम्ही धरा आता त्याचा कान (कान, धरते) स्वस्तीक श्री गण नायक गजमुखम् मोरेश्वरम् व्हाँ व्हाँ व्हाँ...

राजा : दिवाणजी काय करताय ?

दिवाणजी : मानवाचा, मंगल बाईला कळेल पण नवरदेव कोन आहे गाढव.

त्याला हा मंगल कळाला पाहिजे.

या युक्तीवादाने आणि मधूनच व्हाँ व्हाँ व्हाँ करण्याने विनोद निर्माण होतो.

अशा प्रकारे संपूर्ण वगनाट्यात अशा अनेक संवादांमुळे विनोद निर्माण होतात आणि प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन होते. मनोरंजनाबरोबरच बोधही घडवून आणत स्वकर्माची फळे स्वत:ला मिळतात याची प्रचिती दिली आहे.

## ह) लोकरंगभूमीवरील स्थान -

पारंपारिक वगांचे पौराणिक, ऐतिहासिक, लोककथात्मक, सामाजिक अशा प्रकारांमध्ये सामान्यपणे वर्गीकरण करता येते. तसेच वगातील आशयाच्या अभिव्यक्तीवरून वगाचे प्रामुख्याने गंभीर स्वरूपाचे वग आणि रंजक स्वरूपाचे वग असेही प्रकार पाडले जातात. तसेच त्यातील पात्रांच्या अनुषंगाने 'रजवाडी वग' हा ही एक प्रकार मानला जातो.

'सावळ्या कुंभार' हा 'हरिभाऊ वडगांवकरांचा' अत्यंत लोकप्रिय वग नंतरच्या काळात दादू इंदुरीकर यांनी बसवला आणि संपूर्ण महाराष्ट्राला दादू इंदुरीकरांसारखा सोंगाड्या मिळाला. ज्या वगनाट्याला संपूर्ण महाराष्ट्रात तोड नव्हती, एवढे अप्रतिम वगनाट्य म्हणजे 'गाढवाचं लग्न' हे या वगनाट्याचे घाणेकरांच्या सल्लयाने नामकरण दादू इंदुरीकरांनी केले. या वगनाट्याचे मराठी लोकरंगभूमीवरील स्थान अतिशय उंचावरचे आहे. कारण या वगनाट्याची लोकप्रियता काळाच्या ओघात आजही टिकून असल्याचे दिसते. त्यातील वैशिष्ठ्यामुळे एक अविस्मरणीय वगनाट्य म्हणून महाराष्ट्र 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याला ओळखतो.

प्रस्तुत वगनाट्य एकाचवेळी मनोरंजक आणि प्रबोधन करणारे अशा स्वरूपाचे आहे. रंजक, पौराणिक, रजवाडी, गंभीर आणि रंजक वगनाट्यांचे सर्वच गुण या वगनाट्यात पहावयास मिळतात. या वगनाट्यातील छक्कड / छबकड पठ्ठे बापूराव सारख्या महान कवीने/शाहीराने रचलेल्या आहेत. सावळा कुंभार स्वत:च्या पत्नीचे लुगडे उपरणे म्हणून

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

खांद्यावर टाकतो ते लुगडे सुध्दा प्रेक्षकांच्या हंशा आणि टाळ्या देऊन जाते. उत्पजत अभिनय आणि हजरजबाबीपणा या भांडवलावर पब्लिक वारंवार वगनाट्य पाहण्यासाठी येई. अस्सल गावरान बोलीमुळे गाढवाच्या लग्नाने सारा ग्रामीण भाग आकर्षित केला. अनेक शद्बकोट्यांच्या अंतर्भाववामुळे प्रत्येक कोटीबरोबर प्रेक्षकांना हास्यकल्लोळात बुडवून टाकले.

'९ जुलै १९७० साली दादरच्या रविंद्र नाट्यमंदिरातील प्रयोगाला प्रमुख पाहुणे म्हणून आलेल्या 'नवशक्ती'चे संपादक 'पु. रा. बेहेरें'नी इंदुरीकरांधील हसविणाऱ्या सोंगाड्याला मानाचा मुजरा केला'.[१०] विनोदनिर्मितीला फक्त शद्ब पुरेसे नसतात. वास्तवाशी मिळता जुळता अभिनय रसिकांच्या मनात अचूक ठसतो हे वगनाट्याने अनेक प्रसंगातून दाखवून दिले.

२१ सप्टेंबर १९७० ला 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याच्या रौप्यमहोत्सवाच्या प्रयोगाला 'दै. मराठा'च्या संपादिका 'शिरीष पै' हजर होत्या. त्यांनी 'एवढे प्रयोग बघून झाले तरी माझ्या कानांची आणि डोळ्यांची तृप्ती नाही झाली'. [११] हा अभिप्राय दिला. यातून आपणास प्रस्तुत वगनाट्यातील मनोरंजनाचे सामर्थ्य आणि वाढती लोकप्रियता लक्षात येते.

ना. सी. फडके यांसारख्या ज्येष्ठ साहित्यिकांनी हे वगनाट्य पाहून 'शयनगृहाकडे नेणारी तमाशाकला आणि मंदिरातल्या गर्भगृहात नेणारी किर्तनकला दोन्ही या महाराष्ट्राची भूषणं आहेत' [१२] असा आशीर्वाद दिला.

जसराज थिएटरने 'गाढवाचं लग्न' विषयी केलेली एक जाहिरात वृत्तपत्रात फार गाजली ती पुढीलप्रमाणे - 'कुणाची लग्ने सहस्त्रभोजनामुळे गाजतात. तर कुणाची राजकीय पुढाऱ्यांच्या उपस्थितीमुळे कुणाची मानपानामुळेही गाजतात पण हे असलं लग्न आहे की ते पाहण्यासाठी रसिक प्रेक्षक पैसे खर्च करून येतात.' [१३] 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याचे यश बघून 'ठकीचं लग्न' 'कुत्र्याचं लग्न' अशी अनेक वगनाट्ये निघाली आणि बंद पडली पण काळाच्या ओघात 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याची लोकप्रियता आजही टिकून आहे.

'कोपरगावात प्रयोग झाला तेव्हा गावातील सर्व लाऊडस्पिकर आणून लावले तरी

पब्लिकचा आरडाओरडा थांबेना. त्या खेळाला आजपर्यंतच्या गर्दीचा विक्रम मोडला होता. पंचवीस ते तीस हजार माणसं हसून बेजार झाली होती.'[१४] 'गाढवाच्या लग्ना'ची प्रचंड लोकप्रियता आणि गर्दी खेचण्याची ताकद तसेच निखळ मनोरंजनाचे सामर्थ्य कोपरगावात झालेल्या प्रयोगाच्या उदाहरणावरून लक्षात येते.

'गाढवाच्या लग्नाची खासियत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या कानावर गेली आणि 'शिवसेना पुरस्कृत' एक प्रयोग रविंद्र नाट्यमंदिरात ठेवला होता तो हाऊसफुल्ल ठरला.'[१५] सावळ्या कुंभाराच्या वागण्यातील सहजता ग्रामीण जीवनातील खाचाखोचा आणि अभिनयातील रांगडेपणा प्रत्येक रसिक प्रेक्षकाला जाणवत असे त्याचा हजरजबाबीपणा तर रसिकांचे काळीज जिंकत असे.

'गडकरी रंगायतनमध्ये 'गाढवाचं लग्न' चा प्रयोग होता. त्याला ग. दि. माडगूळकर विशेष निमंत्रित म्हणून होते. त्यांनी मी 'कविता' लिहायला सुरवात केली तेव्हा मराठीबद्दल मी लिहिलं होतं.... 'खट्याळ डोळे गव्हाळ कांती उरोज उन्नत, वर्ण सावळा, करडी बोली, भाव कोवळे, मराठीतला ठोक सोहळा' हा अनुभव प्रत्यक्षात रंगभूमीवरच हे लोकनाट्य पाहून २५-३० वर्षांनी मला आला'.[१६] असा अभिप्राय व्यक्त केला होता.

'गाढवाचं लग्न' या वगनाट्याने २० नोव्हे. १९७३ रोजी दादू इंदुरीकर यांना नाटक अकादमीतल्या पारंपरिक नाट्यकलेचं पारितोषिक (अॅवॉर्ड) प्राप्त करून दिले तेही राष्ट्रपतींच्या हस्ते.

इतर कोणत्याही वगनाट्याला अशी पार्श्वभूमी. एवढी प्रसिध्दी आणि एवढा मान क्वचितच मिळाला असेल. इतर अनेक वगनाट्ये निर्माण झाली आणि बंदही पडली. पण 'गाढवाचं लग्न' हे वगनाट्य वेळ आणि काळावर मात करून आजही लोकमानसाचे मनोरंजन करताना आढळले. 'गाढवाचं लग्न' सोडले तर इतर दुसरे कोणतेच पौराणिक, लोककथात्मक वगनाट्य इतक्या प्रदीर्घ काळ लोकरंगभूमीवर स्वतःचे अस्तित्व दाखवत असताना आढळत नाही.

हरिभाऊ वडगावकर त्यांच्या नंतर दादू इंदुरीकर, त्यानंतर त्यांचा मुलगा गणेश

इंदुरीकर नंतर प्रकाश इनामदार, मोहन जोशी अशा अनेक दिग्गजांनी लोकरंगभीमीवर 'गाढवाचं लग्न' साकार केले आहे आणि या वगनाट्याची लोकमानसावरची पकड आज एकविसाव्या शतकातही कमी झालेली नाही. एवढेच काय पण वगनाट्याच्या इतिहासात वगनाट्यावरून चित्रपट निर्मिती होण्याचा पहिला मान तेही पूर्वीच्याच नावाने 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याला मिळालेला आहे आणि आजचा आघाडीचा मराठी अभिनेता मकरंद अनासपुरे 'गाढवाचं लग्न' मधील सावळ्याच्या भूमिकेत चित्रपट प्रेक्षकांची दाद घेत आहे. हीच खरी या वगनाट्याची लोकरंगभूमीवरील अढळ स्थान असल्याची साक्ष म्हणावी लागेल.

सारांश, 'गाढवाचं लग्न' म्हणजे कै. हरिभाऊ वडगावकर यांच्या 'सावळा कुंभार' या वगावरून दादू इंदुरीकर यांनी निर्माण केलेले अप्रतिम वगनाट्य होय. या वगनाट्याचे वैशिष्ट्य म्हणजे हे वगनाट्य 'श्री नवनाथ भक्तिसार' या ग्रंथातील २५ व्या अध्यायातील कथा आहे. या वगनाट्याने अनेक वर्ष प्रेक्षकांना खेचून घेतले, त्यांच्या मनामध्ये स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. या वगनाट्याची बांधणी मात्र पारंपारिक पध्दतीची असल्याचे जाणवते. सुरवातीलाच गण-गौळण आणि नंतर पाच प्रवेशात सावळ्या कुंभाराची कथा येते. शाप उःशापाच्या माध्यमातून तसेच सावळ्याच्या स्वर्गवारीच्या माध्यमातून अद्‌भूतरस परिपोष केलेला आढळतो. तरीही वगनाट्यात पूर्णपणे हास्यरसाचे अधिराज्य आहे. सावळा, गंगी, दिवाणजी यांच्यातील चटपटीत, द्विअर्थी संवाद, चावट, सूचक विनोद प्राचीन काळातील घटना, संदर्भ असतानाही सावळयाच्या तोंडी मधून मधून इंग्रजी शद्ब टाकून समकालीन स्थितीचा व भाषेचा रंग चढवणे व रंजक कथानकामुळे हा वग लोकप्रिय झाला. या लोकप्रियतेत सावळयची भूमिका साकारणाऱ्या दादू इंदुरीकर या हरहुन्नरी अभिनेत्याचा सिंहाचा वाटा होता. बऱ्याच ठिकाणी हास्यरसाच्या साह्यानेच प्रेक्षकांना अंतर्मुख करण्याचा प्रयत्नही 'दारिद्रयाहूनी मरण बरे' किंवा 'देव कोणास म्हणावे' या सारख्या वाक्यातून केल्याचे जाणवते.

एकूण लोकरंगभूमीवरील अत्यंत लोकप्रिय आणि यशस्वी वगनाट्य म्हणून 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याचे स्थान  अत्यंत वरच्या दर्जाचे आहे. या वगनाट्याची लोकप्रियता वेळ काळावर मात करून आजही टिकून आहे. मराठी लोकरंगभूमीवरील 'गाढवाचं लग्न' हे असे एकमेव वगनाट्य आहे की ज्या वगनाट्यावर आधारित चित्रपट निर्माण करण्यात आला तोही वगनाट्याची मूळ संहिता, पात्रे आणि नाव न बदलता आणि हा चित्रपटही प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यात यशस्वी ठरत आहे.

******

# संदर्भ


१) तमाशा कला- पा. ल. जैतापकर,
साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद. पृ.५१,५२.

२) कहाणी वगसम्राटाची. ले. प्रभाकर ओव्हाळ,
श्रीविद्या प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ३९.

३) तत्रैव, पृ. क्र. ४८.

४) तत्रैव, पृ. क्र. ५७, ५८.

५) तत्रैव, पृ. क्र. ४७.

६) नट,नाटक आणि नाटककार, ले. व. शा.देसाई.
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती :१९५६, पृ.३४.

७) श्री नवनाथ भक्तीसार मालुकवी रचित,
प्रकाशक मे. सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे

८) कहाणी वगसम्राटाची. ले. प्रभाकर ओव्हाळ,
श्रीविद्या प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ४५.

९) तत्रैव, पृ. क्र. ४६.

१०) तत्रैव, पृ. क्र.६०.

११) तत्रैव, पृ. क्र. ६०.

१२) तत्रैव, पृ. क्र. ६१.

१३) तत्रैव, पृ. क्र. ६१.

१४) तत्रैव, पृ. क्र. ६२.

१५) तत्रैव, पृ. क्र. ६५.

१६) तत्रैव, पृ. क्र. ७२.


******